# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# रहस्यमय स्वप्न आणि दानिएल




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Mary-Anne S.



60 गोष्टींतील 32 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

नबुखद्नेस्सर राजाने एक स्वप्न पाहिले, यामुळे तो फारच बैचेन झाला होता. परंतू देवाच्या कृपेने दानिएल त्या स्वप्नाचा अर्थ सांगू शकला होता.



1

पहिली गोष्ट दानिएलने केली ती म्हणजे, दानिएलने त्या स्वप्नाचे तंतोतंत वर्णन केले, "महाराज, तुम्ही एक मोठ्या पुतळ्याची प्रतिमा पाहिली, त्याचे स्वरुप विक्राळ होते!"



2


दानिएलने पुढे म्हटले, "त्या पुतळ्याचे डोके उत्तम सोन्याचे होते."
3
"त्याची छाती व हात
चांदीचे होते."
4
"त्याचे पोट व मांड्या
पितळेच्या होत्या."
5
"त्याचे पाय लोखंडाचे व
त्याच्या पावलांचा काही
भाग लोखंडाचा व काही
मातीचा होता."
6
राजाला पुतळ्याचे वर्णन सांगितल्या नंतर, दानिएलने त्याच्या पुढचे स्वप्न देखिल सांगितले.
7
दानिएल राजास म्हणाला, "आपण स्वप्न
पाहात असतां, कोणाचा हात न लागता,
एक पाषाण आपोआप सुटला."
8



"तो पाषाण त्या पुतळ्याच्या
लोखंडी व मातीच्या पावलांवर
आदळून त्यांचे फुटून
तुकडेतुकडे झाले."
9
"तेंव्हा त्या पुतळ्याचा भुगा झाला आणि तो
भुगा वाऱ्याने उडवून नेला." दानिएल थोडावेळ
थांबला. "त्या पुतळ्यांवर आदळलेल्या
पाषाणाचा एक मोठा पर्वत होऊन
त्याने सर्व पृथ्वी व्यापिली."
10
राजाला आश्चर्य वाटले. राजाने पाहिलेले स्वप्न दानिएलने तंतोतंत सागितले
होते ! दानिएलला ते कसे माहित असावे? केवळ देवाने ते दानिएलला कळविले
होते. स्वप्नाचा अर्थ काय आहे हे दानिएल राजाला सांगू लागला.
11
दानिएलाने राजाला म्हटले,
"महाराज, आपल्याला
स्वर्गीय देवाने राज्य,
पराक्रम, बल व वैभव ही
दिली आहेत. आपणच उत्तम
सोन्याचे डोके
आहात."
12
दानिएलने राजाला सांगितले की
त्याच्या सोनेरी राज्याचा अंत
होईल. पुतळ्यातील चांदीचा
भाग म्हणजे त्यानंतर
आपल्याहून कनिष्ठ
असे राज्य
उत्पन्न होईल.
१ ले राज्य
२ रे राज्य
३ रे राज्य
४ थे राज्य
13
आणि पितळेचे असे
तिसरे राज्य होईल.
आणि लोखंड व माती
हे चौथ्या राज्याचे
प्रतिक आहेत.
१ ले राज्य
२ रे राज्य
३ रे राज्य
४ थे राज्य
14

शेवटची गोष्ट दानिएलाने राजाला सांगितली ती हि, "स्वर्गीय देव एका राज्याची स्थापना करील, त्याचा कधी भंग होणार नाही."



15

स्वप्न जाणून घेण्याचे आणि त्याला समजून घेण्याचे ज्ञान केवळ परमेश्वरच देऊ शकतो हे राजाला समजून आले होते. नबुखद्नेस्सर राजाने दानिएलला मोठमोठी इनामें देऊन त्याच्या राज्यात दानिएलला फार महत्वाचा व्यक्ति बनविले.



16



१ ले, २ रे, आणि ३ रे राज्ये आली आणि गेली. ४ थ्या राज्यानंतर देवाचे राज्य येते.

17



सर्व जगावर मसिहा राज्य करील. आणि ते लवकरच घडेल !

18

रहस्यमय स्वप्न आणि दानिएल

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल २

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!